परिपत्रक
अत्यंत महत्वाचे/तातडीचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी–१८. कामगार कल्याण विभाग
क्र. काकअ/३/कावि/६९९/२००४
दिनांक ८/७/२००४

प्रति,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

विषय :– महानगरपालिकेमार्फत देण्यात येणा–या ठेक्यांच्याबाबत सर्व संबंधित ठेकेदारांनी कॉंट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० चे कलम १२ नुसार लायसन्स घेणे बंधनकारक असलेबाबत.

संदर्भ :– १) क्र. काकअ/३/कावि/३०१/२००० दि. ५/१०/२०००
२) क्र. काकअ/३/कावि/४०१/२००० दि. २०/११/२०००
३) क्र. काकअ/३/कावि/४२१/२००० दि. २९/११/२०००

२/– पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांचे अंतर्गत करण्यात येणा–या कामकाजाचे ठेके महानगरपालिकेमार्फत देण्यात येतात. अशा सर्वच ठेकेदारांनी दि कॉंट्रक्ट लेबर ( रेग्यूलेशन ॲन्ड ॲबोजिशन ) ॲक्ट १९७० चे कलम १२ नुसार कामगार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्यामार्फत देण्यात येणारे लायसन्स घेणे क्रमप्राप्त असते. या संदर्भात कामगार कल्याण विभागामार्फत संदर्भिय परिपत्रकान्वये कळवूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

या तरतूदीचे पालन यापूर्वी महानगरपालिकेच्या ठेकेदारांचेकडून केले गेले नसल्याचे उपआयुक्त (कामगार) यांनीही यापूर्वीच महानगरपालिकेचे निदर्शनास आणून दिलेले आहे. या तरतूदीचे संबंधित ठेकेदारांनी पालन न केल्याचे महानगरपालिकेस "प्रिन्सिपल एम्प्लॉयर" म्हणून महानगरपालिकेविरूध्द खटला दाखल होऊ शकतो.

तरी त्या अनुषंगाने सर्व खातेप्रमुखांनी त्यांचे खात्यामार्फत निंगत केलेल्या व चालुस्थितीत काम असलेल्या ठेकेदारांना आणि येथून पुढे देण्यात येणा–या ठेकेदारांना अशा कामा संदर्भात व ज्या कामासाठी २० अथवा त्याहून अधिक कामगार लागणार आहेत. त्यांना दि कॉंट्रॅक्टर लेबर (रेगुलेशन ॲण्ड ॲबोजिशन) ॲक्ट १९७० नियम १२ अंतर्गत कामगार आयुक्त कार्यालय पुणे यांचेमार्फत देण्यात येणारे लायसन्स घेतल्याशिवाय कामाची सुरूवात करता येणार नाही. अन्यथा या प्रकरणी कोणत्याही प्रकारची कायदेशीर जबाबदारी उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण तोशिस ही संबंधित शाखाप्रमुखांवर राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी. सध्या चालू असलेल्या सर्वच कामाच्या ठेकेदारांना सदरचे अधिनियमास अधिन राहून सदरचे लायसन्स घेणेबाबत त्वरित कळविण्यात यावे व याची पूर्तता ३० दिवसात पूर्ण करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८